सं.फौ.ख.क्र.२२८/२०२३
निशाणी क्र. ११ लगत

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की ,**

माझे नाव – तुकाराम प्रभाकर बांदेकर, वय – ५२ वर्षे,

व्यवसाय – मासेमारी

रा. – आनंदवाडी, ता. देवगड

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे प्र. सहा.सरकारी अभियोक्ता श्री. ए.ए.गुमास्ते यांचे मार्फत.**

०१. मी, माझा भाऊ, आई, दोन बहिणी व माझा मुलगा असे माझ्या घरी राहतो. दि.८/०७/२०२३ रोजी सकाळी ६.१५ वा. माझे पुतणे तेजस बांदेकर व तन्मय बांदेकर हे ज्युपिटर गाडीवरुन एस.टी.डेपोत निघाले होते. त्या दिवशी गोव्याला तेजसचा इंटरव्हयु होता. ते स्टॅण्डवर पोहोचले तेव्हा गोव्याची गाडी स्टॅण्डवरुन बाहेर पडली होती त्यामुळे ते एस.टी.थांबवण्यासाठी दिर्बादेवी स्टॉप, जामसंडे येथे जाऊन शेडखाली थांबले. तेथे पणजी एस.टी. येऊन थांबली. त्या दोघांनी गाडीला थांबवण्यासाठी हात केला. तेवढयात पाठीमागून देवगड–वानिवडे एस.टी. आली. त्या चालकाचा ताबा गेल्याने ती एस.टी. थेट शेडला जाऊन धडकली. त्यामुळे शेडमध्ये असलेले तेजस व तन्मय यांच्यावर शेडचे पत्रे पडून त्यांना मार लागला व गंभीर दुखापत झाली. सकाळी ६.३० वा. जामसंडे वरुन फोन आला. त्यावेळी मी घरी होतो. तेव्हा माझ्या ओळखीच्या घाडी नावाच्या इसमाने बंडु कुबल या आमच्या गावच्या व्यक्तीला फोन करुन घटनेबाबत सांगितले. कुबलने आम्हाला कळवले. त्यांनतर मी, नटेश्वर धुरी असे गाडीवरुन सरकारी हॉस्पिटल, देवगड येथे गेलो. तेथे तेजस व तन्मय वर उपचार करण्यात आले.मात्र तेजस व तन्मयला पुढील उपचारासाठी कोल्हापुर येथे पाठविण्यात आले. तेथे तेजसचा मृत्यू झाला. तन्मयचा हात अधु झाला व डोक्याला मार लागला होता. मी घटनेदिवशीच पोलिसांत घटनेबाबत तक्रार केली होती. गाडी चालवणारे एस.टी.चालक पाटील नावाचे होते असे आम्हाला नंतर कळाले. आता मला फिर्याद दाखवली. ती तीच आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

मुदतीचा अर्ज आल्याने **उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–
(श्रीमती एन.बी.घाटगे)
न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड

दि. २६/१२/२०२४